**पोलीस अधीक्षक, सातारा यांचे कार्यालय**
९३, मल्हारपेठ, सातारा ४१५००१.
दुरध्वनी क्रमांक– ०२१६२-२३४१३० (Extn-२२५) फॅक्स क्रमांक– ०२१६२-२३०२३२.
ई-मेल – sp.satara@mahapolice.gov.in

# प्रेसनोट

## पोलीस शिपाई भरती सन २०२२-२०२३

सातारा पोलीस घटकातील पोलीस भरती - २०२२-२३ मधील रिक्त असलेली पोलीस शिपाई/बॅण्डस्मन १९६ व चालक पोलीस शिपाई ३९ पदांची मैदानी चाचणी दिनांक १९/०६/२०२४ ते दि.२७/०६/२०२४ अखेर घेण्यात आलेली आहे. मैदानी चाचणीस पात्र झालेल्या चालक/बॅण्डस्मन उमेदवारांची कौशल्य चाचणी दि.१०/०७/२०२४ ते दि.१३/०७/२०२४ दरम्यान घेण्यात आलेली आहे. मैदानी चाचणीस पात्र उमेदवारांची पोलीस शिपाई पदाची निवडसूची दि.०४/०७/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच, मैदानी व कौशल्य चाचणीत पात्र झालेल्या चालक पोलीस शिपाई व बॅण्डस्मन पदाची निवडसूची दि.१५/०७/२०२४ रोजी सातारा जिल्हा पोलीस दलाच्या अधिकृत संकेतस्थळ www.satarapolice.gov.in यावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. निवड झालेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा दि.२६/०७/२०२४ रोजी **शासकीय धान्य गोदाम, (डी.एम.ओ.गोडावून) नवी एम.आय.डी.सी., पारले कंपनी शेजारी, कोडोली, सातारा ४१५००४** या केंद्रावर खालील प्रमाणे घेण्यात येणार आहे.

| अ.क्र. | तपशील | तारीख | वेळ |
|---|---|---|---|
| १. | पोलीस शिपाई | २६/०७/२०२४ | ०९.०० ते १०.३० |
| २. | चालक पोलीस शिपाई | २६/०७/२०२४ | १२.०० ते १३.३० |
| ३. | बॅण्डस्मन पोलीस शिपाई | २६/०७/२०२४ | १५.०० ते १६.३० |

सदर परीक्षेकरीता उमेदवारांनी परीक्षा वेळेच्या अगोदर ०२ तास परीक्षा केंद्रावर हजर राहणे आवश्यक आहे. लेखी परीक्षेसाठी पात्र झालेल्या सर्व उमेदवारांना **https://policerecruitment2024.mahait.org** या पोर्टलवरून व उमेदवाराचे ई-मेल आयडीवर लेखी परीक्षेचे प्रवेश पत्र (ADMIT CARD) लेखी परीक्षेच्या अगोदर उपलब्ध करून देण्यात येत आहे.

सदर बाबत लेखी परीक्षा दिनांक २६/०७/२०२४ रोजी **शासकीय धान्य गोदाम, (डी.एम.ओ.गोडावून) नवी एम.आय.डी.सी., पारले कंपनी शेजारी, कोडोली, सातारा ४१५००४** येथे आयोजीत करण्यात आलेली आहे. तरी उमेदवारांनी वरील पोर्टलवरून आपले लेखी परीक्षेचे प्रवेश पत्र प्राप्त करुन तसेच ओळखपत्र (आधारकार्ड, पॅनकार्ड इ.) लेखी परीक्षेस येताना सोबत घेवून येणे बंधनकारक आहे. ज्या उमेदवारांकडे लेखी परीक्षेचे प्रवेश पत्र नसेल तसेच जे उमेदवार वेळेत हजर राहणार नाहीत त्यांना परीक्षा केंद्रात प्रवेश देण्यात येणार नाही याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(समीर शेख)
पोलीस अधीक्षक सातारा.